# ‘शेतकऱ्यांसाठी हवा तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर’

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘शेतकऱ्यांसाठी म्हणून तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर शक्य झाला, तर पुण्यात नुकत्याच झालेल्या अडत्यांच्या संपासारख्या समस्यांवरही प्रभावी उपाय निघू शकतो. त्याआधारे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालासाठी हमीभाव मिळणेही शक्य होऊ शकेल,’ असा विश्वास ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांनी सोमवारी पुण्यात व्यक्त केला.

‘मायविश्व टेक्नोलॉजी’तर्फे शेतकऱ्यांसाठी म्हणून विकसित करण्यात आलेल्या ‘फार्मर्सऑर्ग.इन’ या मोबाइल ॲपला नाना पाटेकर यांच्या नाम या स्वयंसेवी संस्थेने आपले पाठबळ दिले आहे. त्या विषयीची माहिती देण्यासाठी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत पाटेकर यांनी हे मत मांडले. ‘मायविश्व’चे संस्थापक आणि कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, संचालक सुप्रिया लिमये आणि गौरी बापट, बाळासाहेब नागवडे आदी या वेळी उपस्थित होते.

या ॲपच्या आधारे 'मायविश्व'ने शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणल्याने शेतकऱ्याला



आपल्या मालाची किंमत ठरविता येणार आहे. शेतीमालाची सन्मानाने विक्री करण्याची सुविधाही या ॲपच्या आधारे त्यांना शक्य होणार असल्याचा विश्वास पाटेकर यांनी या निमित्ताने व्यक्त केला.

पुण्यातील अडत्यांच्या संपाविषयी भाष्य करताना पाटेकर म्हणाले, ‘शेतकऱ्यांसाठी वाजवी भाव देणारा व्यापारी हा लागतोच. याचा अर्थ मी अडत्यांची भलावण करतो, असे नाही. इतर उत्पादनांना वाजवी भाव मिळू शकतो. त्यांचा खर्च आणि फायदाही वाढू शकतो. शेतकऱ्यांबाबत केवळ उत्पादन खर्च वाढतो. फायदा वाढविण्याचा कोणी विचार करत नाही. अशा वेळी तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल.’ या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना, पीक विम्याची सुविधा आदी बाबींची माहिती दिली जाणार आहे. या पुढील टप्प्यात तज्ज्ञांचा सल्ला मिळवून देण्याची सुविधाही उपलब्ध करून देणार असल्याची माहिती जोगळेकर यांनी दिली.

# ‘जात हा कॉलम नकोच’

**पुणे** : ‘कोपर्डीसारख्या घटनांचा समाजातील तरुणांनी प्रतिकार करायला हवा. माझ्यासोबत असे कोणी वागले असते, तर मी स्वसंरक्षणासाठी मारले असते,’ अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांनी सोमवारी पुण्यात नोंदविली. या घटनेनंतर जातीवादी भाष्य करणाऱ्यांचा निषेध करताना पाटेकर यांनी आपल्याकडचा ‘जात’ हा कॉलमच काढून टाकायला हवा, असे मतही मांडले.

पुण्यात एका समारंभाच्या निमित्ताने आलेल्या पाटेकर यांना कोपर्डी घटना आणि त्यानंतर सुरू झालेल्या जातीय आरोप- प्रत्योरापांविषयी पत्रकारांनी प्रश्न विचारले. त्या वेळी पाटेकर यांनी आपली या घटनेविषयी, तसेच जातीवादाविषयीची भूमिका मांडली.

पाटेकर म्हणाले, ‘समाजातील तरुणांनी अशा प्रकारांचा प्रतिकार करायला हवा. आपल्या घरातील महिलांबाबत असा प्रकार घडला असता, तर आपण शांत बसलो असतो का, याचा विचार अशा वेळी करायला हवा. प्रत्येकाने समाजामध्ये वावरत असताना आपली जात घरात ठेवायला हवी. भारतीय म्हणून वावरलो तरच आपली प्रगती शक्य आहे.’

## ‘निवडणुकीला उभे राहायचे नाही’

‘मला निवडणुकीला उभे राहायचे नाही. आजपर्यंत सुदैवाने कोणी जात विचारली नाही. कलावंताला जात नसते त्यामुळे असेल कदाचित,’ अशी प्रतिक्रिया पाटेकर यांनी या वेळी एका प्रश्नाला उत्तर देताना नोंदविली. ‘नाम फाउंडेशन आणि त्या निमित्ताने मिळालेल्या सन्मानाविषयी पाटेकर म्हणाले, ‘आमच्यासारख्या खूप संस्था चांगले काम करत आहेत. त्या माहिती नसल्याने आणि ‘नाम’साठी आमचा चेहरा असल्याने आमचे काम उचलून धरले जात आहे. त्यामुळे पुरस्कार वगैरे ऐकल्यावर सुरुवातीला हसू आले.’